**Time : 2 Hours** **FIRST-TERM** **MARATHI LANG. II (CWSN)**

**Subject Code**

| H | 4 | 4 | 3 | 2 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 40 (Printed Pages : 12) Maximum Marks : 40**

**सूचना :** (*i*) प्रश्नपत्रिकेचे एकूण **चार** विभाग आहेत.

(*ii*) प्रत्येक प्रश्नाखाली उत्तराचे चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी एक उत्तर अचूक आहे.

(*iii*) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका (OMR Sheet) दिलेली आहे. प्रत्येक प्रश्न–क्रमांकासमोर चार पर्यायांसाठी क्रमाप्रमाणे वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले एकच वर्तुळ बॉलपेनने रंगवा.

(*iv*) एकदा बॉलपेनने वर्तुळ रंगवून नोंदवलेली उत्तरे बदलता येणे अशक्य आहे. त्यामुळे वर्तुळे रंगविताना योग्य ती काळजी घ्यावी.

(*v*) अचूक उत्तराचे वर्तुळ रंगवलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी एक गुण मिळेल. उत्तर चुकल्यास शुन्य गुण. उत्तरे चुकल्यास गुण कमी केले जाणार नाहीत. नकारात्मक (Negative) मूल्यांकन होणार नाही.

(*vi*) उत्तरे नोंदविण्यासाठी एकच उत्तरपत्रिका दिली जाईल.

(*vii*) उत्तरे नोंदविण्यासाठी काळ्या अथवा निळ्या बॉलपेनचा वापर करावा.

## विभाग I : गद्य

1. स्वाती नक्षत्रावरील पाऊस कोठे पडतो ? 1

(A) जमीनीत

(B) आकाशात

(C) समुद्रात

(D) पाताळात

2. डॉ. माशेलकरांच्या प्रकाशवाटेला सतत प्रेरणा देणारे शिक्षक कोण ? 1

(A) डॉ. नायुडम्मा

(B) प्रा. शर्मा

(C) सानगुरुजी

(D) भावेसर

3. 'यत्न तो देव जाणावा' हे वचन कोणत्या पाठातून घेतले आहे ? 1

(A) मोत्याचे पीक

(B) माझी प्रकाशवाट

(C) यत्नदेवाची उपासना

(D) मांजर व्हा

4. 'मांजर व्हा' या कथेचा प्रकार कोणता ? 1

(A) फँटसी कथा

(B) बोध कथा

(C) ग्रामीण कथा

(D) लोक कथा

5. 'काय झालं बाई वासराला' हे वाक्य कोणी कोणास म्हटले ? 1

(A) संन्याशाने कारभारणीला म्हटले

(B) समुद्राने पाणबुड्यांना म्हटले

(C) पहिल्या पाणबुड्याने कारभारणीला म्हटले

(D) संन्याशाने पाणबुड्यांना म्हटले

6. 'तू घरात लक्ष घालू नकोस. शिकण्याकडे लक्ष दे. पोट हे भरतचं' हे वाक्य कोणी कोणास म्हटले ? 1

(A) डॉ. नायुडम्माने डॉ. माशेलकरांना म्हटले

(B) प्रा. शर्माने डॉ. माशेलकरांना म्हटले

(C) आईने डॉ. माशेलकरांना म्हटले

(D) भावेसरांनी डॉ. माशेलकरांना म्हटले

7. यत्नदेवाची पूजा करायला कोणता काळ उपयुक्त ठरतो ? 1

(A) प्रौढदशा

(B) विद्यार्थीदशा

(C) तारुण्यदशा

(D) वृद्धदशा

8. दुसऱ्या दिवशी लेखक जादूगाराकडे गेले कारण त्यांना ............... 1

(A) माकड व्हायचं होतं

(B) हत्ती व्हायचं होतं

(C) कुत्रा व्हायचं होतं

(D) मांजर व्हायचं होतं

**विभाग II : पद्य**

9. .................... न देखता गाई हुंबरती। 1

(A) मत्स्य

(B) बालक

(C) वत्स

(D) पक्षी

10. नमो मायबापा गुरु ………………… 1

(A) आनंदघना

(B) कृपाघना

(C) दयाघना

(D) प्रकाशघना

11. परि तुवां ……………… तिज दिधले. 1

(A) वचन

(B) शपथ

(C) कथुन

(D) सांगून

12. तेच दंश करिती आम्हा साप हे ……………… 1

(A) कट्यारी

(B) तलवारी

(C) विषारी

(D) दुधारी

13. 'चक्रवाक पक्षी' या अभंगाचे संत कवी कोण ? 1

(A) संत तुकाराम

(B) संत नामदेव

(C) संत एकनाथ

(D) संत ज्ञानेश्वर

14. संत एकनाथांनी आपल्या कवितेत कोणाची प्रशंसा केली आहे ? 1

(A) स्वत:ची

(B) स्वामीची

(C) आई-वडिलांची

(D) गुरुची

15. 'सागरा प्राण तळमळला' या कवितेत कवी कोणाशी संवाद साधतात ? 1

(A) भूमीशी

(B) सागराशी

(C) आईशी

(D) नदिशी

16. 'आसवेच स्वातंत्र्याची आम्हांला मिळाली' ही ओळ कोणत्या कवितेतून घेतली आहे ? 1

(A) चक्रवाक पक्षी

(B) गुरुमहिमा

(C) उष:काल होता होता

(D) सागरा प्राण तळमळला

## विभाग III : व्याकरण

17. 'खूप खूप मोती पिकू देत' या वाक्यातील 'मोती' या शब्दाची जात ओळखा : 1

(A) विशेष नाम

(B) सामान्य नाम

(C) भाववाचक नाम

(D) सर्वनाम

18. 'त्याच्या प्रसादाशिवाय भाग्य किंवा थोरवी प्राप्त व्हावयाची नाही' या वाक्यातील उभयान्वयी अव्यय कोणता ? 1

(A) त्याच्या

(B) प्रसादाशिवाय

(C) किंवा

(D) थोरवी

19. 'माझी बायको तांदूळ नीट करीत बसली होती' या वाक्यातील 'माझी' या शब्दाची जात ओळखा. 1

(A) नाम

(B) सर्वनाम

(C) विशेषण

(D) क्रियापद

20. 'महापालिकेच्या मराठी शाळेत मी शिकलो' या वाक्यातील क्रियापद कोणते ? 1

(A) महापालिकेच्या

(B) मराठी

(C) शाळेत

(D) शिकलो

21. 'मर्द' या शब्दाचे भाववाचक नाम कोणते ? 1

(A) मर्दपणा

(B) मर्दानगी

(C) मर्दगिरी

(D) मर्दत्व

22. ‘मानव’ या शब्दाचे भाववाचक नाम ओळखा : 1

(A) मानवपण

(B) मानवता

(C) मानवी

(D) मानवत्व

23. ‘सावध’ या शब्दाचे भाववाचक नाम कोणते ? 1

(A) सावधान

(B) सावधानी

(C) सावधगिरी

(D) सावधानता

24. ‘दया’ या शब्दाचे विशेषण कोणते ? 1

(A) दायित्व

(B) दयाळू

(C) दयासागर

(D) दयावान

25. ‘मेहनत’ या शब्दाचे विशेषण कोणते ? 1

(A) मेहनतीपणा

(B) मेहनताना

(C) मेहनत्व

(D) मेहनती

26. 'राष्ट्र' या शब्दाचे विशेषण कोणते ? 1

(A) राष्ट्रीय

(B) राष्ट्रत्व

(C) राष्ट्रीयत्व

(D) राष्ट्रीयता

27. 'बाहेर' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा : 1

(A) जवळ

(B) दूर

(C) लांब

(D) आत

28. 'सामान्य' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? 1

(A) समान

(B) मान्य

(C) असामान्य

(D) असमान

29. 'पुण्य' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? 1

(A) ताप

(B) श्राप

(C) जाप

(D) पाप

30. 'उपयोगी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? 1

(A) निरुपयोगी

(B) सदुपयोगी

(C) बहुपयोगी

(D) दुरुपयोगी

## विभाग IV : लेखन

31. 'पोटात कावळे ओरडणे' या वाक्प्रचाराचा अर्थ कोणता ? 1

(A) पोटात दुखणे

(B) पोट बिघडणे

(C) खूप भूक लागणे

(D) पोट भरणे

32. 'अवहेलना करणे' म्हणजे काय ? 1

(A) राग येणे

(B) हेटाळणी करणे

(C) प्रयत्न करणे

(D) प्रार्थना करणे

33. 'भांबावून जाणे' या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा : 1

(A) वश करून घेणे

(B) निघून जाणे

(C) गोंधळून जाणे

(D) मोठ्याने ओरडणे

34. 'काळजी नसणे' या अर्थाचा वाक्प्रचार कोणता ? 1

(A) फिकीर नसणे

(B) लग्गा साधणे

(C) छाप पाडणे

(D) नाकाने कांदे सोलणे

35. ‘मदत करणे’ या अर्थाचा वाक्प्रचार कोणता ? 1

(A) आटोकाट प्रयत्न करणे

(B) पिचून जाणे

(C) कामातून जाणे

(D) हातभार लावणे

36–40. खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा :

आत्मसन्मान म्हणजे मुलांनी रेखाटलेली स्वत:ची प्रतिमा असते. मुलांना स्वत:विषयी काय वाटतं ती भावना असते. त्यांच्या वागणुकीत ही भावना प्रतिबिंबित झाल्याचं दिसून येतं. आत्मसन्मान ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. सशक्त आत्मसन्मानातून, सकारात्मक विचारांची निर्मिती होते आणि त्याची परिणती सकारात्मक कृतीत होते. आत्मसन्मानाचं नातं प्रकृतिस्वास्थ्याशी असल्याचं संशोधनातून सिद्ध झालं आहे. त्यामुळे मुलाचे स्वत:विषयी चांगले विचार असतील तर मुलाची सर्वांगीण प्रगती जास्त चांगली होते. मुलांमध्ये स्वत:विषयी चांगली भावना हवीच. त्यांचा आत्मसन्मान त्यांच्या भोवतीच्या व्यक्तीनी त्यांना कितपत आपलंसं केलंय, त्यांना किती महत्त्व दिलंय यावरही अवलंबून असतो. ही जाणीव महत्त्वाची आहे. त्यामुळे आपल्या जीवनातील एक घटक म्हणून आपण त्यांचा आनंदाने स्वीकार करतो आहोत अशी जाणीव त्यांच्या मनात निर्माण होते. मुलांना कधीही गृहीत धरू नका. मुलांच्या शारीरिक, भावनिक व बौद्धिक या तिन्ही बाबतीत आपण काळजी घेतो हे त्यांना स्पष्टपणे जाणवलं पाहिजे. त्यातूनच त्याचा आत्मसन्मान जोपासला जाईल.

—डी.एन.बी. सिंग

36. आत्मसन्मान म्हणजे काय ? 1

(A) मुलांनी रेखाटलेली स्वत:ची प्रतिमा

(B) मुलांनी रेखाटलेली आईवडिलांची प्रतिमा

(C) मुलांनी रेखाटलेली शिक्षकांची प्रतिमा

(D) मुलांनी रेखाटलेली लोकांची प्रतिमा

37. मुलांच्या यशाची गुरुकिल्ली कोणती ? 1

(A) आत्मविश्वास

(B) स्वाभिमान

(C) आत्मसन्मान

(D) अभिमान

38. आत्मसन्मानातून कोणत्या विचारांची निर्मिती होते ? 1

(A) नकारात्मक

(B) परोपकारात्मक

(C) सृजनात्मक

(D) सकारात्मक

39. संशोधनातून आत्मसन्मानाचं नातं कोणाशी असल्याचं सिद्ध झालं आहे ? 1

(A) भावनिक प्रतिबिंबाशी

(B) प्रकृतीस्वास्थ्याशी

(C) आनंदाशी

(D) स्वत:च्या प्रतिमेशी

40. मुलांचा आत्मसन्मान कसा जोपासला जातो ? 1

(A) शारीरिक अंगाची काळजी घेऊन

(B) भावनिक अंगाची काळजी घेऊन

(C) बौद्धिक अंगाची काळजी घेऊन

(D) शारीरिक, भावनिक व बौद्धिक अंगाची काळजी घेऊन